# दिनांक 16/03/2025

**1** कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 14/03/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे चिंचवली खोंडा आदीवासी वाडी ता रोहा येथे महिला फिर्यादी या त्यांच्या गावातील 15 आरोपीत सर्व रा.रोहा हे फिर्यादी यांचे दीर साक्षीदार यांना मारहाण करीत असताना फिर्यादी या त्यांची सोडवासोडव करण्याकरीता गेले असता वरील सर्व आरोपीत यांनी फिर्यादी यांना हाताबुक्कयाने मारहाण करून शिवीगाळी केली तसेच फिर्यादी यांचे कपडे फाडून अश्लील असे बोलून यांती आरोपीत यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून फिर्यादी यांचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे गुरनं.27/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 115, 352, 151(2),189(1),189(2),191(2),190,74,76 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/सुर्यकांत भोजकर हे करीत आहेत.

**2.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/02/2025 रोजी 07:00 वा च्या सुमारास मौजे लाखरन येथील कर्जत मुरबाड रोडवर ता.कर्जत येथे आरोपीत रा. साळोख तर्फे निड ता कर्जत, जि.रायगड हे त्यांचेकडे मोटारसायकल चालवण्याचा परवाना नसताना तसेच मोटारसायकलची विमा पॉलीसीची मुदत संपलेली आहे हे माहीत असताना त्यांची अॅक्टीवा क्र.एम.एच-46 बी.आर 6835 हिचेवर यातील मयत नामे लक्ष्मण कृष्णा कडु ,वय-64 वर्षे यांना मोटारसायकलवर पाठीमागे बसुन स्वत: सदरची मोटारसायकल ही कडाव बाजुकडुन कर्जत बाजुकडे चालवित घेवुन जात असताना लाखरन फाटा येथे आलेवेळी मोटारसायकल अविचाराने व हयगयीने बेदरकारपणे चालवुन रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष केल्याने मोटारसायकलवर बसलेले मयत नामे लक्ष्मण कृष्णा कडु, वय-64 वर्षे हे मोटारसायवरुन खाली पडल्यामुळे लहान मोठया स्वरुपाच्या दुखापती होवुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाला.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.75/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम-106, 125(अ)(बह,281,324(2) सह मोटार वाहन कायदा कलम 184,182,196 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/वारा हे करीत आहेत.

**3.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे आगरी समाज हॉल, साई मंदिर नेरळ येथे ता.कर्जत येथे फिर्यादी रा.बिरदोले ता.कर्जत यांनी मनसे पक्ष

वाढीचे अनुषंगाने मिटींग लावली होती. सदर मिटींग करीता कर्जत तालुक्यातील मनसेचे 10 ते 15 कार्यकर्ते तसेच मनसे कर्जत तालुका अध्यक्ष व मनसे कर्जत तालुका सचिव मनसे रायगड जिल्हा सचिव आरोपी नं.01 व त्याचे सोबत असलेले इसम आरोपी नं.02 हे देखील उपस्थित होते. सदर मिटींग चालू असताना फिर्यादी हे पक्ष बांधणीबाबतचे प्रश्न विचारत होते त्या गोष्टीचा आरोपीत क्रमांक 01 यांना राग येवुन त्यांनी फिर्यादी यांचे सोबत वाद करुन आरोपीत क्रमांक 01 व 02 यांनी संगनमत करून फिर्यादी यास हाताबुक्याने मारहाण करुन, शिवीगाळी, दमदाटी केली तसेच आरोपीत क्रमांक 02 यांनी त्यांचे हातातील कडा फिर्यादी यांचे डोक्यात मारुन डोक्यास दुखापत केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.47/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118(1),115(2),352,351 (2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/लावरे हे करीत आहेत.

**4.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे वाळण खुर्द गावचे हददीत लिंग्याच्या डोंगरावरिल जंगलभागात येथे मयत आरोपीत राहुल शिवाजी लाड याने स्वतःचे ताब्यात बेकायदेशीर सिंगल नळीची बंदुक बाळगुन दि.09/03/2025 रोजी 13.00 वाजता सुमारास बंदुकीचा निष्काळजीपणे वापर केल्याने त्यातुन अपघाताने काडतुस उडून तो स्वतःचे डावे छातीचे खालील बाजुस गंभीर जखमी होवुन अतिप्रमाणामध्ये रक्तस्राव होऊन तो स्वतःचे मरणास कारणीभूत झालेला आहे.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.28/2025, शस्त्र अधिनियम, 1959 3,25, भा.न्या.सं 2023 चे कलम 105 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/जीवन माने हे करीत आहेत.

**5.** म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 14:30 वा च्या सुमारास मौजे खरसइ येथे राइस मिलचे समोर बोर्ली ते म्हसळा अशा जाणाया सिमेंट रोडवर येथे फिर्यादी रा. कुडगाव, ता.श्रीवर्धन हे त्यांची आकाशी व काळया रंगाची टीव्हीएस ॲन्टाक 125 स्कुटी मोटारसाइकल क्र.एमएच-06 सी एन 7783 ने कुडगाव ते म्हसळा असे बोर्ली ते म्हसळा सिमेंट रोडने जात असताना आरोपीत रा. मेंदडी कोंड ता म्हसळा जि रायगड याने त्याचे मालकीची हीरो होंडा शाईन मोटारसायकल के एम एच 06 सीजी 1550 ही ट्रिपल शिट जोरात वेगाने, हयगयीने बेदारकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवीत घेवुन मयत याचे मोटारसायकल क्रमांक एम.एच.06 सी एफ 8451 ला समोरुन ठोकर मारुन अपघात करुन अपघातात मयत यांचे डोक्याला व उजवे पायाला गंभीर स्वरुपाच्या लहान मोठ्र्या स्वरुपाच्या दुखापती करुन त्याचे मरणास तसेच फिर्यादी व वरील जखमी याचे गंभीर व किरकोळ स्वरुपाच्या दुखापतीस कारणीभुत होवुन मोटारसायकलाचे नुकसानीस कारणीभुत झाला आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे गुरनं.18/2025, मोटार वाहन अधिनियम 1988 चे कलम 184, भा.न्या.संहिता 2023 चे कलम 106,281,125 B,125 a,324(4) प्रमाणे गुन्हा दाखल

.करण्यात आला असून अधिक तपास पोसई/रोहीणकर हे करीत आहेत.

**6**. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 10:30 वा च्या सुमारास मौजे खुरावले, ता.सुधागड येथील हॉटेल येथे गेले त्यावेळी ता.सुधागड 13/03/2025 रोजी सकाळी 10.30 वाजताचे सुमारास महिला फिर्यादी यांचे पती हे आमचे घराचे काम करणारे मेस्त्री यांचे पैसे देण्याकरीता त्यांचा आरोपी भाउ यांचे खुरावले येथील हॉटेलमध्ये गेले असताना आरोपी याने त्यांचे घरासमोरील अंगणातील दगडी काढल्याचा मनात राग धरून फिर्यादी यांचे पती यांना उजवे हाताचे मनगटावर तसेच डावे पायावर व डोक्यात लोखंडी शिगेची झोड मारून मनगटाचे हाड फ्रॅक्चर त्यांस गंभीर स्वरुपाची दूखापत करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

याबाबत पाली पोलीस ठाणे गुरनं.28/2025, BNNS 109 352 प्रमाणे गुन्हा दाखल .करण्यात आला असून अधिक तपास पोसई/राम पवार हे करीत आहेत

**7**. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास मौजे.धाकटे वेणगाव, ता.कर्जत येथे महिला फिर्यादी या त्यांचे राहते घरी असताना फिर्यादी यांचे घरासमोर राहणारी महिला आरोपी नं.04 हीने गावात गोंगाट केला कि, फिर्यादी यांची मुलगी हिने दि.11/03/2025 रोजी साक्षीदार हिच्या मुलीच्या हाळदीच्या कार्यक्रमात बियर पिली असा गोंगाट करुन आरोपीत क्र.4 हिने सदरची माहिती फिर्यादी यांचे पती यांना सांगितली म्हणुन त्याबाबत फिर्यादी यांनी आरोपीत क्र.4 हिला विचारणा केली त्याचा मनात राग धरुन आरोपीत क्र.1 ते 4 यांनी संगणमत करुन फिर्यादी तसेच साक्षीदार यांना त्यांचे राहते घरासमोर शिवीगाळी दमदाटी करुन हाताबुक्यांनी मारहाण केली तसेच सदर कारणावरुन आरोपीत क्र.2 याने त्याच्या हातातील दगड फिर्यादी यांचे डोक्यात मारल्यामुळे फिर्यादी हिस दुखापत झाली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.76/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 115(2),352,351(2)(3),3(5प्रमाणे गुन्हा दाखल .करण्यात आला असून अधिक तपास पोह/भोईर हे करीत आहेत

**8.** महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे वरंध गावचे हद्दीत बेबीचा गोल येथील तीव्र उतारावरील वळणावर ता.महाड येथे आरोपीत एस.टी बस चालक रा. मु.पारमाची,पो.माझेरी ता.महाड याने त्याचे ताबेतील एस.टी बस क्र.एमएच-20 बीएल 3822 ही रामदास पठार येथुन महाड बाजुकडे चालवित घेवुन जात असताना अपघात ठिकाणी आलेवेळी त्याचे ताबेतील एस.टी बस ही रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन हयगयीने बेदरकारपणे चालवुन रस्त्याचे रॉग साईडला जावुन रस्त्याचे खाली खड्यात जावुन पलटी करुन अपघात करुन अपघतामध्ये एस.टी बस मधील 18 प्रवासी एस.टी बस वरील वाहक व स्वत:च्या साध्या व गंभीर दुखापतीस तसेच एस.टी बसचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.29/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 281,125(ए), 125(बी),मोटार वाहन कायदा कलम 1988 कलम 184 प्रमाण गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/चनप्पा अंबरगे हे करीत आहेत.

**9**. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 17:45 वा च्या सुमारास मौजे इसांबे गावाचे हददीत श्री नाखनजी इंटरप्रायझेस कंपनीमधील ता.खालापुर येथे महिला फिर्यादी रा. विठठल नगर बीडी पाटील मागव्हाणपाडा चेंबूर मुंबई, या कंपनीत काम करीत असताना आरोपी याने फिर्यादीचे जवळ येवुन मला तुझा सोबत फेंन्डशिप करायची आहे, लेडीज आणि जेन्टस यामध्ये काय फरक आहे बोलुन फिर्यादी हिचा हात पकडुन फिर्यादीच्या मनास लज्जा उत्पन्न केली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 90/2025, भारतीय न्याय संहिता (बी एन एस) कलम 75(1) 1 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/कांबळे हे करीत आहेत.

**10.** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 13/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे चोरडे ता-मुरूड येथे फिर्यादीच्या घरासमोर ओटीवर येथे , मुरूड आरोपीत रा.चोरडे ता.मुरुड याने फिर्यादी यांचे घराचा दरवाजा वाजवल्याने फिर्यादीची पत्नी साक्षीदार हिने दरवाजा उघडल्यावर आरोपीत याने फिर्यादीचे ओटीवर येवुन तुमच्या झाडाची फांदी आमच्या घराच्या कौलाला लागत असल्याने ती तोडुन टाका असे बोलून मागील भाडणाचा मनात राग धरून आरोपीत यांने फिर्यादी व फिर्यादीची पत्नी यांना हाताबुक्याने मारहान करून शिवीगाळी केली व जिवे ठार मारण्याची धमकी दिली त्यावेळी फिर्यादीची आई हे भांडण सोडविण्यासाठी आलेअसता तिला हाताबुक्याने मारहान करून घराचे ओटी वरून खाली ढकलुन दिल्याने तिचे डावे पायाच्या मांडीच्यावर खुब्याजवळ गंभीर दुखापत झाली.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.31/2025, भारतीय न्याय सहीता 2023 117(1) (2), 333,115(2)352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/संजय ठाकूर हे करीत आहेत.

**11.** पोयनाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 15/03/2025 रोजी 18:20 वा च्या सुमारास मौजे शहबाज गावचे हददीतील पी,पी,डी,पी,स्टेशन पी,एन,पी पोर्ट येथे, अलिबाग फिर्यादी हे पी,पी,डी,पी,स्टेशन ते पी,एन,पी पोर्ट कंपनीचे मध्ये मालगाडी शटींग करीत असताना मालगाडी क्रॉसिंग गेट मध्ये थांबवली याचा आरोपीत शहाबाज ता.अलिबाग यांनी मनात राग धरून फियादी मालगाडीच्या ब्रोक यान मध्ये असताना ब्रोक यानवर दगड मारून फियादी यांना किरकोळ जखमी केले तसेच आरोपी ब्रोक यांन मध्ये चढुन फियादी याची कॉलर पकडुन त्यांना खाली खेचुन आरोपीत यांने त्याचे हाता मध्ये असलेल्या केबलने वायर फिर्यादीचे पाठीवर हातावर कमरेवर पोटावर मारून दुखापत केलीतसेच क्रॉसिगगेटवर डयुटीला असलेले डी,एस,एस,जी सिक्युरीटी क्ंपनीचे गार्ड जेनुन हक याला तु गेट का बंद केलास असे बोलुन त्याला देखील हाताने मारहाण केली तसेच फिर्यादी यांचा मोबाईल वर लाथ मारून मोबाईलचा डिसप्ले तोडुन नुकसान केले

याबाबत पोयनाड पोलीस ठाणे गुरनं.24/2025, भा.न्या.संहिता कलम 132,115(2),

118(1),125,352,333,324(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.म्हात्रे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 15.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 306 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,95,150/-रुपये इतका दंड आकारला आहे.